

# श्री ज्ञानेश्वरी
## अध्याय पाचवा

या अध्यायाला कर्मसंन्यास योग म्हणतात. तिसऱ्या अध्यायाची सुरवात व पाचव्या अध्यायाची सुरवात जवळजवळ अर्जुनाच्या एकाच प्रकारच्या प्रश्नाने होते. तिसऱ्या अध्यायात अर्जुन विचारतो की कर्माचा जर तूच निषेध करतोस तर मला कर्म का करावयास सांगतोस. चौथ्या अध्यायात सन्यास मार्ग श्रेष्ट असे प्रतीपादन केले असा समज होऊन अर्जुन कर्मयोग व सन्यास यात काय श्रेष्ठ असा प्रश्न करतो. म्हणून भगवंत पुनः कर्म करण्यास का सांगतात हे तिसऱ्या अध्यायापासून सुरु केलेले निरुपण पाचव्या अध्यायात पुढे सुरु आहे. कर्माचे महत्व व त्याचा संन्यासाशी संबंध या अध्यायात निरुपण केला आहे. मोक्ष प्राप्ती करता ज्ञान व ज्ञान प्राप्तीकरता कर्म ही आवश्यक आहेत . केवळ सांख्य मताप्रमाणे कर्मत्याग का करु नये या प्रश्नाचे स्पष्टिकरण या अध्यायात आहे त्याच प्रमाणे नाथपंथीय योगाचे संक्षिप्त वर्णन केले आहे . याचा विस्तार पुढे 6 व्या अध्यायात केला आहे.

यात 29 श्लोक असून त्यावर 180 ओव्या आहेत. या अध्यायात देखील महाराजांनी 14,17,23,या श्लोकांवर त्रोटक भाष्य केले आहे.

## श्रीज्ञानेश्वरी
## अध्याय पाचवा

**अर्जून उवाच**

**संन्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि ।**
**यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ।।1।।**

**अर्जुन म्हणाला -हे कृष्णा! एकदां संन्यास, तर पुनः कर्मांचा योग म्हणजे कर्मे करीत राहाण्याचा मार्गच उत्तम असे सांगता; तरी या दोहोपैकी खरोखरीच जे श्रेय म्हणजे अधिक प्रशस्त ते एकच निश्चितपणे मला सांगा.**

मग पार्थू श्रीकृष्णाते म्हणे । '' हां हो ! हे कैसे तुमचे बोलणे ! ।
एक होय ; तरी अंतःकरणें [1] । विचारु[2] ये ।।1।। — 1 मनापासून 2 विचार केला
मागां , सकळ कर्माचा संन्यासु ।तुम्हीचि निरोपिला [3] होता बहुवसु [4] ,। — 3 सांगीतला 4सर्वप्रकारे
तरी कर्मयोगी केवी अतिरसु [5] । पोखीतसा [6]? पुढती ।।2।। — 5 महत्व 6 वाढवणे
ऐसे द्व्यर्थ हे बोलता । आम्हा नेणतयांच्या चित्ता ,।
आपुलिये चाडे [7] , श्रीअनंता ! । उमजु नोहे ।।3।। — 7 बुद्धि ने
ऐके , एकसारातें [8] बोधिजे ,। तरी एकनिष्ठचि बोलिजे । — 8 एकच तत्त्व
हे आणिकी काय सांगिजे ।तुम्हाप्रति ? ।।4।। — 9 असंदिग्ध
तरी , याचिलागी तुमतें ।म्यां राउळासि [10] विनविले होते । — 10 देवांना
जो 'हा परमार्थु ' ध्वनितें [11] । न बोलावा ।।5 । । — 11 गूढ अर्थाने
परी मागील असो , देवा ! ।आतां प्रस्तुती उकलु देखावा ।
सांगै , दोहीमाजि बरवा । मार्गु कवणु ? ।।6।।
जो परिणामीचा निर्वाळा [12] । अचुंबितु ये फळा । — 12 शुद्ध
आणि अनुष्ठिता , प्रांजळा [13] । सावियाचि [14] ।।7।। — 13 सरळ 14 सहजच
जैसे , निद्रेचे सुख न मोडे , । आणि मार्गु तरी बहुसाल सांडे [15] । — 15फार मोठा आक्रमीला जातो
तैसे , सोहोकासन [16] सांगडे [17] । सोहपे [18] होय '' ।।8।। — 16 सुखकारक वाहन 17 सारखे18 सोपे
येणे अर्जुनाचेनि बोले , ।देवो मनी रिझले ।
मग, ' होईल ; ऐके म्हणितले ' । संतोषोनिया ।।9।।
देखा , कामधेनु ऐसी माये । सदैवा [19] जया होये ,। — 19 भाग्यवान
तो चंद्रही परी लाहे । खेळावया ।।10।।
पाहे पां , श्रीशंभूची प्रसन्नता ! ।तया उपमन्युचिया आर्ता ।
काय , क्षीराब्धि दूधभाता । देइजेचिना ?।।11।।
तैसा , औदार्याचा कुरुठा।श्रीकृष्णु आपु जाहलिया , सुभटा ! ।
कां सर्व सुखांचा वसौटा[20] । तोचि नोहावा ? ।।12।। — 20 वसतीस्थान

एथ चमत्कारु कायसा ? ।गोसावी श्रीलक्ष्मीकांताऐसा ।
आतां आपुलिया सवेसा [1] ।मागावा की ! ।।13।। 1 इच्छेप्रमाणे
म्हणौनि , अर्जुने म्हणितले । ते हांसोनि येरे दिधले ।
तेचि सांगेन बोलिले ।काय , कृष्णे ।।14।।

**श्रीभगवान् उवाच**
**संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ ।**
**तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ।।2।।**
**श्रीभगवान म्हणाले कर्मसंन्यास व कर्मयोग हे दोन्ही मार्ग निःश्रेयसकर म्हणजे मोक्ष प्राप्त करून देणारे आहेत ; पण या दोहोत कर्मसन्यासापेक्षा कर्मयोगाची योग्यता किंवा मातब्बरी विशेष आहे**

तो म्हणे ' गा कुंतीसुता ! । हे संन्यासयोगु विचारितां ।
मोक्षकरु तत्त्वता । दोनीही होती ।। 15 ।।
तरी , जाणा नेणां सकळा ।हा कर्मयोगु कीर प्रांजळा [2] । 2 सरळ
जैसी , नाव स्त्रिया , बाळां । तोयतरणी ।। 16।।
तैसे , सारासार पाहिजें ।तरी सोहपा हाचि देखिजे ।
येणे संन्यासफळ लाहिजे । अनायासे ।।17।।
आतां याचिलागी सांगेन । तुज , सन्यासियाचे चिन्ह ।
मग , सहजे हे अभिन्न , । जाणसी तूं ।।18।।

**ज्ञेयःस नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न काङ्क्षति ।**
**निर्द्वंद्वो हि महाबाहो सुखं बंधात्प्रमुच्यते ।।3।।**
**जो कशाचाहि द्वेष करीत नाही आणि कशाचीहि इच्छा करीत नाही,तो पुरुष कर्मे करूनहि नित्यसंन्यासी समजावयाचा; कारण, हे महाबाहो अर्जुना ! जो सुखदुःखादि द्वंद्वापासून मुक्त झाला तो अनायासेचि कर्माच्या सर्व बंधांपासून मुक्त होतो.**

तरी, गेलियाची से [3] न करी । न पवता, चाड न धरी । 3 आठवण
जो सुनिश्चळु अंतरी ।मेरु जैसा ।।19।।
आणि मी , माझे , ऐसी आठवण ।विसरले जयाचे अंतःकरण ।
पार्था ! तो संन्यासी जाण । निरंतर ।। 20।।
जो मने ऐसा जाहला ।संगी तोचि सांडिला ।
म्हणौनि , सुखे सुख पावला । अखंडित ।।21।।
आतां गृहादिक आघवे , । ते काही नलगे त्यजावे ।
जें , घेते जाहले स्वभावे । निःसंगु म्हणौनि ।।22।।

देखै , अग्नि विझोनि जाये । मग जे राखोंडी केवळु होये ,।
तै ते कापुसे गिवसू[1] ये । जियापरी ।।23।। 1 गुंडाळता
तैसा , असतेनि उपाधी[2] । नाकळिजे तो कर्मबंधी । 2 देहादि प्रपंच
जयाचिये बुद्धि ।संकल्पु नाही[3]।।24।। 3 मानसीक कर्मप्रवृत्ति नाही
म्हणौनि , कल्पना जै सांडे , । तैचि गा संन्यासु घडे ।
इये कारणे , दोनी सांगडे[4] । सन्यासयोगु ।।25।। 4 सारखे

**सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदन्ति न पण्डिताः ।**
**एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विन्दते फलम् ।।4।।**
**सांख्य म्हणजे कर्मसंन्यास आणि योग म्हणजे कर्मयोग हे भिन्न आहेत असे मूर्ख लोक म्हणतात; पंडित तसे म्हणत नाहीत.कोणताही एक मार्ग चांगल्या तऱ्हेने आचरल्यास दोहीचे फळ मिळते.**

एऱ्हवी तरी पार्था ! । जे मूर्ख होती सर्वथा ।
ते सांख्ययोगुसंस्था[5] ।जाणती केवी ? ।।26।। 5 सांख्य व कर्मयोग यांची सम्यक व्यवस्था
सहजे ते अज्ञान , । म्हणौनि म्हणती ' ते भिन्न ' ।
एऱ्हवी , दीपाप्रति[6] काई आनान ।प्रकाशु आहाती ? ।।27 ।। 6 दीपागणिक
पै , सम्यक येणे अनुभवे , । जिही देखिले तत्व आघवे ,।
ते , दोहीतेही ऐक्यभावे । मानिती गा ।।28।।

**यत्सांख्यै ः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते ।**
**एकं सांख्यं च योगं च य ः पश्यति स पश्यति ।।5।।**
**ज्या मोक्षस्थानी सांख्य मार्गातले लोक पोचतात,तेथेच योगी( कर्मयोगीही) जातात.सांख्य आणि योग हे दोन मार्ग असे एकच आहेत हे ज्यांने पाहिले त्यानेच खरे तत्त्व ओळखले म्हणावयाचे**

आणि सांख्यी जे पाविजें , । तेचि योगी गमिजे ।
म्हणौनि , ऐक्य दोहीते सहजे । इयापरी ।।29।।
देखै , आकाशा आणि अवकाशा , । भेदु नाही जैसा ।
तैसे , ऐक्य योगसंन्यासा । वोळखे जो , ।। 30 ।।
तयासीचि जगी पाहले[7], । आपणपे[8] तेणेचि देखिले , । 7 ज्ञान झाले 8 आत्मतत्व
जया , सांख्ययोग जाणवले । भेदेविण ।। 31 ।।

**संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगत ः ।**
**योगयुक्तो मुनिर्ब्रह्म न चिरेणाधिगच्छति ।।6।।**
**संन्यास झाला तरी हे महाबाहो ! तो योगाखेरीज म्हणजे कर्माखेरीज प्राप्त होणे दुर्घट होय. जो मुनी कर्मयोगयुक्त झाला त्याला ब्रह्माची प्राप्ति होण्यास उशीर लागत नाही.**

जो युक्तिपंथे पार्था ! । चढे मोक्षपर्वता , ।
तो महासुखाचा निमथा [1] । वहिला [2] पावे ।।32।। 1 शीखर 2 शीघ्र
येरा , योगस्थिति जया सांडे , ।तो वायांचि गा हव्यासी पडे ।
परि , प्राप्ति कही न घडे । संन्यासाची ।।33।।

**योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेंद्रिय ः ।**
**सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ।।7।।**

**जो कर्मयोगयुक्त झाला,ज्याचे अंतःकरण शुद्ध,ज्याने आपले मन आणि इंद्रिये जिंकली व सर्व भुतांचा आत्मा हाच ज्याचा आत्मा झाला,तो सर्व कर्मे करीत असतांहि कर्माच्या पाप-पुण्यापासून अलिप्त असतो.**

जेणे भ्रांतीपासून हिरतले [3]। गुरुवाक्ये मन धुतले । 3.हिरावून घेतले
मग आत्मस्वरूपी घातले । हारौनिया [4] ।। 34।। 4 लीन होउन
जैसे , समुद्री लवण न पडे । तंव वेगळे , अल्प , आवडे [5] । 5 भासते
मग , होय सिंधूचि एवढे । मिळे तेव्हा ।।35।।
तैसे , संकल्पोनि काढिले ।जयाचे मनचि चैतन्य जाहले , ।
तेणे एकदेशिये [6] ; परी व्यापिले । लोकत्रय ।।36।। 6 मर्यादित
आतां कर्ता कर्म करावे , । हे खुंटले तया स्वभावे ।
आणि करी , जऱ्ही आघवे ।तऱ्ही अकर्ता तो ।।37।।

**नैव किंचित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित् ।**
**पश्यञ्शृण्वन्स्पृशञ्जिघ्रन्नश्नन्गच्छन्स्वपन्श्वसन् ।।8।।**
**प्रलपन्विसृजन्गृह्णन्नुन्मिषन्निमिषन्नपि ।**
**इंद्रियाणीद्रियाथेषु वर्तन्त इति धारयन् ।।9।।**

**योगयुक्त तत्त्ववेत्त्या पुरुषानी ' मी काहीच करीत नाही ' असे समजावे; आणि पहाताना, ऐकताना, स्पर्श करिताना,वास घेताना,खाताना,चालताना,निजताना,श्वासोश्वास करिताना बोलताना,विसर्जन करितांना,घेताना,डोळ्याच्या पापण्याची उघडमिट करताना केवळ इंद्रिये आपआपल्या विषयांचे ठायी वर्तत आहेत अशी बुद्धि ठेवून वागावे.**

जें ,पार्था ! तया देही ।' मी ' ; ऐसा आठऊ [7] नाही । 7 आठवण
तरी कर्तृत्व कैचे काई । उरे ? सांगै ।।38।।
ऐसे तनुत्यागेवीण ।अमूर्ताचे गुण ।
दिसती संपूर्ण । योगयुक्तां ।।39।।
एऱ्हवी , आणिकाचिये परी । तोही एक शरीरी ।
अशेषाही व्यापारी । वर्ततु दिसें ।।40।।

तोही नेत्री पाहे । श्रवणी ऐकतु आहे ।
परि , तेथीचा सर्वथा नोहे । नवल देखे ! ।।41।।
स्पर्शासि तरी जाणे । परिमळु सेवी घ्राणे ।
अवसरोचित बोलणे ।तयाहि आथी ।। 42।। 1 प्रसंगानुरुप
आहाराते स्वीकारी । त्यजावे ते परिहरी ।
निद्रेचिया अवसरी , । निदिजे सुखे ।।43।।
आपुलेनि इच्छावशे ।तोही गा चालतु दिसें ।
पै , सकळ कर्म ऐसें । रहाटे कीर ।।44।।
हे सांगो काई ऐकैक ! । देखे , स्वासोच्छ् वासादिक ।
आणि निमिषोन्निमिष [2] ।आदि करूनि ।।45।। 2 पापण्याची उघडझाप
पार्था ! तयाचे ठायी । हे आघवेचि आथि , पाही ! ।
परी , तो कर्ता नव्हे काही । प्रतीतिबळे [3] ।।46।। 3 भोगप्रवृत्तिने
जै ,भ्रांति सेजे सुतला [4] , । तै स्वप्नसुखे भुतला [5] । 4 निजला 5 व्यापला
मग , तो ज्ञानोदयी चेइला । म्हणौनियां ।।+47।।

**ब्रह्मण्याधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोति य ः ।**
**लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवाम्भसा ।।10।।**
**ब्रह्माचे ठायी अर्पण करून आसक्तिविरहित जो कर्मे करितो त्याला,कमळाच्या पानाला जसे पाणी चिकटत नाही**

आता अधिष्ठानसंगती [5] । अशेषाही इद्रियवृत्ती । 5 प्रकृतीच्या संसर्गाने
आपुलालिया अर्थी ।वर्तत आहाती ।।48।।
दीपाचेनि प्रकाशे । गृहीचे व्यापार जैसे , ।
देही कर्मजात तैसें । योगयुक्ता ।।49।।
तो कर्मे करी सकळे । परी कर्मबंधा नाकळे ।
जैसे , न सिंपे , जळी , जळे । पद्मपत्र ।।50।।

**कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिंद्रियैरपि ।**
**योगिन ः कर्म कुर्वन्ति सङगं त्यक त्वा ऽऽत्मशुद्धये ।।11।।**
**म्हणून कर्मयोगी मी करितो अशी अहंकारबुद्धि न ठेविता केवळ शरीराने,केवळ मनाने , केवळ बुद्धिने आणि केवळ इंद्रियांनेहि आसक्ति सोडुन आत्मशुद्ध्यर्थ कर्मे करित असतो**

देखे बुद्धीची [6] भाष नेणिजे । मनाचा अंकुर [7] नुदैजे । 6 विचारपूर्वक 7 मनात
ऐसा व्यापारु , तो बोलिजे ।शारीरु गा ।।51।। इच्छा येत नाही

| | |
|---|---|
| हेच मराठे [1] परियेशी । तरी बाळकाची चेष्टा जैशी । | 1 सोप्या रीतीने |
| योगिये कर्मे करिती तैशी । केवळा तनु ।।52।। | |
| मग , पांचभौतिक संचले [2] , । जेव्हां शरीर असे निदेले ,। | 2 बनलेले |
| तेथ , मनचि रहाटे एकले । स्वप्नी जेवीं ।।53।। | |
| नवल ऐके , धनुर्धरा ! ।कैसा वासनेचा संसारा [3] । | 3 विस्तार |
| देहा होऊ नेदी उजगरा [4] , । परी सुखदुःखे भोगी ।। 54।। | 4 जागृती |
| इंद्रियांच्या गावी नेणिजें , । ऐसा व्यापारु जो निपजें । | |
| तो केवळु गा म्हणिजें । मानसाचा ।।55।। | |
| योगिये तोही करिती । परी कर्मे ते न बंधिजती । | |
| जे ,सांडिली आहे संगती । अहंभावाची ।।56।। | |
| आतां , जाहालिया भ्रमहत [5] । जैसे पिशाचाचे चित्त । | 5 भ्रमिष्ट |
| मग ,इंद्रियांचे चेष्टित [6] । विकळु [7] दिसें ।।57।। | 6 क्रीया 7 संबधरहित |
| स्वरुप तरी देखे , । आळविले आइके , । | |
| शब्दु बोले मुखे , । परी ज्ञान नाही ।।58।। | |
| हे असो ; काजेविण ।जें , जे काही करण , । | |
| ते केवळ कर्म जाण । इंद्रियांचे ।। 59।। | |
| मग , सर्वत्र जे जाणतें , । ते बुद्धिचे कर्म निरुतें [8] । | 8 शुध्द |
| ओळख , अर्जुनाते । म्हणे हरी ।।60।। | |
| ते बुद्धी धुरे [9] करुनी ,। कर्म करिती चित्त देऊनी , । | 9 प्रमुख |
| परी , ते नैष्कर्म्यापासुनी । मुक्त दिसती ।।61।। | |
| जे, बुद्धिचिये ठावूनि [10] देही, । तयां अहंकाराची सेचि [11] नाही । | 10 स्थीरावुन 11 जाणीव |
| म्हणौनि , कर्म करिता, पाही । चोखाळले ।।62।। | |
| अगा , करितेनवीण कर्म , । तेचि ते नैष्कर्म्य । | |
| हे जाणती सुवर्म । गुरुगम्य [12] जे ।।63।। | 12 गुरुकडून जाणले |
| आता , शांतरसाचे भरितें । सांडीत आहे पात्रातें । | जाणारे |
| जें , बोलणे बोलापरौते । बोलवले ।।64 ।। | |
| एथ इंद्रियांचा पांगु [13] ।जया फिटला आहे चांगु , । | 13 संसर्ग |
| तयासीचि आथि लागु । परिसावया ।।65।। | |
| ‘ हा असो अतिप्रसंगु । न संडी पां कथालागु । | |
| होईल श्लोकसंगति भंगु ।म्हणौनिया ।। 66।। | 14 कठीण |
| जे मना आकळिता कुवाडे [14] । घाघुसिता [15] बुद्धी नातुडे [16] । | 15 प्रयत्न करून देखील |
| ते दैवाचेनि सुरवाडे [17] ।सांगवले तुज ।। 67।। | 16 स्वाधीन होणे |
| जे शब्दातीत स्वभावे , । ते बोलीचि जरी फावे , । | 17 अनुकुलतेने |
| तरी आणिके काय करावे ? । कथा सांगै ‘ ।।68।। | |

हा आर्तिविशेषु श्रोतयांचा । जाणोनि , दास निवृत्तीचा ।
म्हणे ' संवादु दोघांचा । परिसोनि परिसा ।।69।।
मग श्रीकृष्ण म्हणे पार्थातें । ' आतां प्राप्ताचे चिन्ह पुरतें ।
सांगेन तुज ; निरुतें [1] । चित्त देई ।।70।।

1 स्पष्टपणे

**युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शान्तिमाप्नोति नैष्ठिकम् ।**
**अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते ।।12।।**

**जो युक्त म्हणजे योगयुक्त झाला, तो कर्मफल सोडून देऊन अखेरची पूर्ण शांती मिळवतो, आणि अयुक्त म्हणजे जो योगयुक्त नाही तो कामाच्या म्हणजे वासनेच्या योगाने फलाचे ठीकाणी सक्त होउन पापपुण्याने बांधला जातो.**

तरी आत्मयोगे आथिला [2] ,। जो कर्मफळाशी विटला ।
तो , घर रिघोनि [3], वरिला । शांति जगी ।। 71।।
येरु , कर्मबंधे , किरीटी ! । अभिलाषाचिया गाठी ।
कळासला [4] खुंटी । फळभोगाच्या ।।72 ।।

2 संपन्न झाला
3 प्रवेश करून
4 बांधला जातो

**सर्वकर्माणि मनसा संन्यस्याऽऽस्ते सुखं वशी ।**
**नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ।।13।।**

**सर्व कर्माचा मनाने,साक्षात नव्हे,संन्यास करून,जितेंद्रिय देहवान् पुरुष नऊ द्वारांच्या देहरूपी नगरात काही न करिता व न करविता आनंदाने पडला असतो.**

जैसा फळाचिये हावे , । तैसे कर्म करी आघवे , ।
मग , ' न कीजेचि ' येणे भावे । उपेक्षी जो ।। 73 ।।
तो जयाकडे वासु पाहे [5] । तेउती सुखाची सृष्टी होये ।
तो म्हणे , तेथ राहे । महाबोधु ।।74 ।।
नवद्वारे , देही ।तो असतुचि , परि नाही ।
करितुचि , न करी कांहीं । फलत्यागी ।।75।।

5 मार्ग पाहतो

**न कर्तुत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभु ः ।**
**न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते ।।14।।**

**प्रभु म्हणजे आत्मा किंवा परमेश्वर लोकांचे कर्तुत्व,त्यांची कर्मे,किंवा त्यांना प्राप्त होणारी कर्मफलाची जोडही निर्माण करीत नाही.स्वभाव म्हणजे प्रकृतीच सर्व काही करीत असते.**

जैसा कां सर्वेश्वरु , । पाहिजे तंव निर्व्यापारु , ।
परि , तोचि रची विस्तारु । त्रिभुवनाचा ।। 76।।
आणि कर्ता ऐसे म्हणिपे , । तरी कवणे कर्मी न शिंपे ।
जें , हातुपावो न लिंपे । उदासवृत्तीचा ।। 77 ।।
योगनिद्रा तरी न मोडे , । अकर्तेपणा सळु [1] न पडे , । 1 भंग
परि , महाभूतांचे दळवाडे । उभारी भले ।। 78।।
जगाच्या जीवी आहे , । परि कवणाचा कही नोहे ।
जगची हे होय जाये, । तो शुद्धीहि नेणे ।।79।।

**नाऽऽदत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभु ः ।**
**अज्ञानेनाऽऽवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तव ः ।।15।।**

**विभु म्हणजे सर्वव्यापी आत्मा किंवा परमेश्वर कोणाचे पाप व कोणाचे पुण्यहि घेत नाही. ज्ञानावर अज्ञानाचे पांघरूण पडले असल्यामुळे म्हणजे मायेने प्राणी मोह पावतात.**

पापपुण्ये अशेषे [2] ।पासीचि असतु , न देखे । 2 संपूर्ण
आणि साक्षीही होऊ न ठके । येरी [3] गोठी कायसी ? ।। 80।। 3 इतर
पै , मूर्तीचेनि [4] मेळे , । तो मूर्तचि होऊनि खेळे , । 4 सगुणपणा
परि , अमूर्तपण न मैळे । दादुलयाचे [5] ।।81।। 5 समर्थाचे
तो सृजी , पाळी , संहारी । ऐसे बोलती जे चराचरी , ।
ते अज्ञान गा ! अवधारी । पंडुकुमरा ! ।।82।।

**ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मन ः ।**
**तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम् ।।16।।**

**पण ज्याचे स्वतःचे हे अज्ञान ज्ञानाने नष्ट झाले त्यांना सूर्याप्रमाणे त्याचे ज्ञान परमार्थतत्त्व प्रकाशित करून देते.**

ते अज्ञान जै समूळ तुटे , । तै भ्रांतीचे मसैरे [6] फिटे । 6 काळोखी
मग , अकर्तुत्व प्रगटे । मज ईश्वराचे ।।83।।
एथ ईश्वरु एकु अकर्ता । ऐसे मानले जरी चित्ता , ।
तरी , ' तोचि मी ' हे स्वभावता ।आदीचि आहे ।। 84।।
ऐसेनि विवेके उदो चित्ती , ।तयासी भेदु कैचा त्रिजगती ? ।
देखे , आपुलिया प्रतीति । जगचि मुक्त ! ।।85।।
जैशी , पूर्वदिशेच्या राउळी । उदया येताचि , सूर्य दिवाळी ।
कीं , येरीही दिशा , तियेचि काळी । काळिमा नाही ।।86।।

**तद् बुद्धयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायण ः ।**
**गच्छन्त्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूतकल्मषा ः ।।17।।**
**आणि त्या परमार्थतत्त्वातच ज्यांची बुद्धि रंगली , तेथेच ज्यांचे अतःकरण रमले व जे तन्निष्ठ व तत्परायण झाले,त्यांचे पाप ज्ञानाने निःशेष धुउन जाउन ते पुनःजन्मास येत नाहीत.**

बुद्धिनिश्चये [1] आत्मज्ञान । ब्रह्मरूप भावी [2] , आपणा आपण । 1 श्रद्धायुक्त बुद्धि 2 चिंतन
ब्रह्मनिष्ठा राखे पूर्ण ।तत्परायण अहर्निशी ।।+87।। करतात
ऐसे व्यापक ज्ञान भले , । जयाचिया हृदया गिवसित आलें , ।
तयांची समतादृष्टि , बोले ।विशेषू काई ? ।।88।।
एक , आपणपाचि जैसे ।ते देखती विश्व तैसें ।
हे बोलणे , कायसे । नवलु एथ ? ।।89।।
परी , दैव [3] जैसे , कवतिके [4] ।कहीचि दैन्य न देखे , । 3 सुदैवी 4 गम्मत म्हणून
कां , विवेकु हा नोळखे । भ्रांतीते जेवीं ।। 90।।
नातरी , अंधकाराची वानी [5] । जैसा सूर्यो न देखे स्वप्नी । 5 वार्ता
अमृत नायके कानी । मृत्युकथा ।।91।।
हे असो ,संतापु [6] कैसा ।चंद्रु न स्मरे जैसा । 6 उष्णता
भूती भेदु नेणती तैसा , । ज्ञानिये ते ।।92।।

**विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।**
**शुनि चैव श्वपाके च पंडिता ः समदर्शिन ः ।।18।।**
**जे पंडित( ज्ञानी) झाले त्यांची दृष्टि विद्याविनययुक्त ब्राह्मण,गाय,हत्ती,तसेच कुत्रा आणि चांडाल, याच्या ठायी सामान असते !.**

मग हा मशकु , हा गजु , ।की हा श्वपचु [7] , हा द्विजु , । 7 चांडाळ
पैल इतरु , हा आत्मजु , । हे उरेल कें ?।।93।।
ना तरी , हे धेनु , हे श्वान , । एक गुरु , एक हीन , ।
हे असो ; कैचे स्वप्न । जागतया ? ।।94।।
एथ भेदु तरी की देखावा , । जरी अहंभाव उरला होआवा , ।
तो आधीचि नाही आघवा , । आतां विषमु काई ? ।।95।।

**ईहैव तैर्जित ः सर्गो येषां साम्ये स्थितं मन ः ।**
**निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद् ब्रह्मणि ते स्थिता ः ।।19।।**
**ज्यांचे मन साम्यावस्थेत स्थिर झाले ते मरणाची वाट न पहाता मृत्युलोकाला जिंकतात कारण ब्रह्म हे निर्दोष व सम आहे ,म्हणून हे पुरुष नेहमीच ब्रह्माच्या ठायी येथल्या येथेच ब्रह्मभूत होतात.**

म्हणौनि सर्वत्र सदा सम , ।ते , आपणचि अद्वय ब्रह्म ।
हे , संपूर्ण जाणे वर्म । समदृष्टीचे ।।96।।

जिही विषयसंगु न सांडिता , । इंद्रियाते न दंडिता , ।
परी , भोगिली निसंगता । कामनेविण ।।97। ।
जिही , लोकांचेनि आधारे , । लौकिकेचि व्यापारे , ।
परि , सांडिले निदसुरे [1] । लौकिकु हें ।।98।। 1 अज्ञान
जैसा , जनामाजि खेचरु [2] ।असतुचि , जना नोहे गोचरु । 2 पिशाच्च
तैसा , शरीरी , परी संसारु । नोळखे तयांतें ।।99।।
हे असो ; पवनाचेनि मेळे , । जैसे जळीचि जळ लोळे ,।
ते , आणिके म्हणती ' वेगळे । कल्लोळ हे ' ।।100।।
तैसें नाम रुप तयाचें , । एऱ्हवी , ब्रह्मचि तो साचे ।
मन साम्या आले जयाचे । सर्वत्र गा ! ।।101।।
ऐसेनि समदृष्टी जो होये , । तया पुरुषा लक्षणही आहें ।
अर्जुना ! संक्षेपे [3] सांगेन पाहे , । अच्युत म्हणे ।।102।। 3 थोडक्यात

**न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाप्रियम् ।**
**स्थिरबुद्धिरसंमूढो ब्रह्मविद् ब्रह्मणि स्थित ः ।।20।।**

**इष्ट वस्तु प्राप्त झाली की आनंदु नये, आणि अप्रिय प्राप्त झाले असता खिन्नहि होऊ नये.याप्रमाणे ज्याची बुद्धि स्थिर,व जो मोह पावत नाही तोच ब्रह्मवेत्ता ब्रह्माचे ठायी स्थित झाला म्हणावयाचा.**

तरी मृगजळाचेनि पूरे , । जैसे न लोटिजें [4] कां गिरिवरे । 4 ढकलणे
तैसा , शुभाशुभी न विकरे [5] , ।पातलिया जो ।। 103।। 5 विकार उत्पन्न होत नाही
तोचि तो निरुता [6] ।समदृष्टी तत्त्वता । 6 खरोखर
हरि म्हणे, ' पंडुसुता ! । तोचि ब्रह्म ' ।।104।।

**बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विन्दत्यात्मनि यत्सुखम् ।**
**स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षय्यमश्नुते ।।21।।**

**बाह्य पदार्थांच्या इंद्रियांशी होणाऱ्या संयोगात म्हणजे विषयभोगात ज्याचे मन आसक्त नाही त्यालाच आत्म्यामध्ये जे काय सुख आहे ते मिळते व ब्रह्माशी मिळून युक्त झालेला तो पुरुष अक्षय सुखाचा अनुभव घेतो.**

जया आपणपे सांडूनि , कही । इंद्रियग्रामावरी येणेचि नाही ।
तो विषय न सेवी ; हे काई । विचित्र येथ ? ।।105।।
सहजे स्वसुखाचेनि अपारे , । सुरवाडलेनि [7] अंतरे , । 7 रंगुन जाणे
रचिला ; म्हणौनि बाहिरे । पाऊल न घाली ।।106।।
सांगै , कुमुददळाचेनि ताटे । जो जेविला चंद्रकिरणे चोखटे , ।
तो चकोरु , काई वाळुवंटे । चुंबितु असे ? ।।107।।

तैसे , आत्मसुख उपाइले [1] , । जयासि आपणपेचि फावले ।   1 उत्कृष्ट
तया , विषयो सहजे सांडवले । म्हणो काई ? ।।108।।
एऱ्हवी , तरी कौतुके । विचारुनि पाहे पां ! निके ।
या विषयांचेनि सुखे ।झकविती [2] कवण ? ।।109।।   2 फसतात

**ये हि संस्पर्शजा भोगा दुः खयोनय एव ते ।**
**आद्यन्तवन्तः कौन्तेय न तेषु रमते बुधः ।।22।।**

**बाह्य पदार्थांच्या संयोगामुळेच उत्पन्न होणारे जे भोग त्यास आदि व अंत असल्यामुळे ते दुःखाचेच कारण होत. त्यांचे ठायी शहाणा पुरुष, हे कौन्तेया रत होत नाही.**

जिही आपणपे नाही देखिले , । तेचि इही इंद्रियार्थी रंजले ।
जैसे , रंकु , कां आळुकैले [3] । तुषांते [4] सेवी ।।110।।   3 भुकेला 4 कौंडा
नातरी, मृगे तृषापीडिते । संभ्रमे ,विसरोनि जळाते , ।
मग , तोयबुद्धी बरडीते [5] । ठाकुनि येती ।।111।।   5 माळरान
तैसे , आपणपे नाही दिठे [6] । जयाते स्वसुखाचे सदा खराटे [7] ।   6 दिसलेले 7 दुष्काळ
तयासीचि , विषय हे गोमटे । आवडती [8] ।।112।।   8 भासतात
एऱ्हवी , विषयी सुख आहे , । हे बोलणेचि सारिखे नोहे , ।
तरी , विद्युत्स्फुरणे कां न पाहे । जगामाजी ?।।113।।   9 वारा10 पाऊस 11 उन
सांगै,वात[9] वर्ष[10] आतपु[11] धरे ।ऐसे अभ्रच्छायाचि जरी सरे [12] ।   12 कार्यभाग साधला जातो
तरी त्रिमाळिके [13] धवळारे [14] ।करावी का ? ।।114।।   13 तीनमजली 14 चुनेगच्ची
म्हणौनि, विषयसुख जे बोलिजे ।ते ,नेणता,गा वाया जल्पिजे [15] ।   घर 15 व्यर्थ बडबड
जैसे , महूर [16] का म्हणिजे । विषकंदाते ।।115।।   16 मधूर
नातरी , भौमा [17] नाम मंगळु । रोहिणीते [18] म्हणती जळु ।   17 पृथ्विपुत्र 18मृगजळ
तैसा , सुखप्रवादु बरळु । विषयिकु हा ।।116।।
हे असो आघवी बोली ; । सांग पां ! सर्पफणीची साउली ।
ते शीतल होईल केतुली । मूषकासी ? ।।117।।
तैसा , आमिषकवळु [19] , पांडवा ! । मीनु न सेवी, तंवचि बरवा ।   19 अमीषाला लावलेला घास
तैसा , विषयसंगु आघवा । निभ्रांत जाणे ।।118।।
हे विरक्तांचिये दिठी । जै न्याहाळिजे , किरीटी ! ।
तै , पांडुरोगाचिये पुष्टी [20] । सारिखे दिसे ।।119।।   20 अनेमियाने फुगलेला
म्हणौनि , विषयभोगी जे सुख , ।ते साद्यंतचि जाण , दुःख ।
परि काय कीजे , मूर्ख । न सेविता न सरे[21] ।।120।।   21 उपभोगाशिवाय
ते अंतर नेणती बापुडे । म्हणौनि अगत्य सेवणे घडे ।   राहत नाही
सांगै , पुयपंकीचे किडे । काय चिळसी [22] घेती ? ।।121।।   22 कीळस

तया दुःखिया दुखःचि जिव्हार [1] । ते विषयकर्दमीचे [2] दर्दुर [3] । 1 आवडते 2 विषयरुपी चिखल
ते भोगजळीचे जळचर ।सांडिती केवी ? ।। 122।। 3 बेडुक
आणि दुःखयोनि जिया आहाती ।तिया निरर्थका तरी नव्हती ? ।
जरी विषयावरी विरक्ती ।धरिती जीव ?।।123।।
नातरी , गर्भवासादि संकट ।का , जन्ममरणीचे कष्ट ।
हे विसांवेवीण वाट । वाहावी कवणे[4] ?।।124।। 4 भोगतील कोण
जरी विषयी विषयो सांडिजेल , । तरी महादोषी के वसिजेल ? ।
आणि संसारु हा शब्दु नव्हेल। लटिका [5] जगी ? ।।125।। 5 खोटा
म्हणौनि , अविद्याजात नाथिले [6] । ते तिहीचि साच दाविले । 6 मिथ्या
जिही सुखबुद्धि घेतले । विषयदुःख ।।126।।
याकारणे गा सुभटा ! ।हा विचारिता विषय वोखटा [7] । 7 वाईट
तू झणे [8] कही [9] या वाटा । विसरोनि जाशी ।।127।। 8 नको 9 केव्हाहि
पै ,याते विरक्त पुरुष । त्यजिती का जैसे विष । 10 निरिच्छ
निराशा [10] ,तया दुःख । दाविले [11] नावडे [12] ।। 128 ।। 11 ओढवलेले 12 भासत नाही

**शक्नोतीहैव यः सोढुं प्राक्शरीरविमोक्षणात् ।**
**कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः ।।23।।**

**शरीर सुटण्यापूर्वी अर्थात आमरणान्त कामक्रोधामुळे होणारा वेग इहलोकीच सहन करण्यास इंद्रियसंयमनाने जो समर्थ होतो ,तोच मुक्त आणि तोच खरा सुखी पुरुष होय**

ज्ञानियांच्या, हन , ठायी । याची मातुही कीर नाही ।
देही , देहभावो जिही ।स्ववश केले ।।129।।
जयांते बाह्याची भाष । नेणिजेचि निःशेष , ।
अंतरी सुख । एक आथि ।।130।।
परि , ते वेगळेपणे भोगिजे । जैसे पक्षिये फळ चुंबिजे ।
तैसे नव्हे ; तेथ विसरिजें । भोगितेपणही ।।131 ।।
भोगी अवस्था एकी उठी , । ते अहंकाराचा अंचळु [13] लोटी । 13 पडदा
मग सुखेसि घे आंटी [14] । गाढेपणे ।।132।। 14 आलिंगन
तिये आलिंगनमेळी । होय ,आपेआप कवळी [15] । 15 आलिंगन
तेथ , जळ जैसे जळी । वेगळे न दिसें ।।133।।
का , आकाशी वायु हारपे , । तेथ ' दोन्ही ' हे भाष लोपे ।
तैसे , सुखचि उरे स्वरुपे । सुरती [16] तिये ।।134।। 16 भोग
ऐसी द्वैताची भाष जाय , । मग म्हणो जरी ' एक होय ' ।
तरी , तेथ साक्षी कवणु आहे ? । जाणते जे ।।135।।

**योऽन्तःसुखोऽन्तरारामस्तथान्तर्ज्योतिरेव य ः ।**
**स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ।।24।।**
**लभन्ते ब्रह्मनिर्वाणमृषयः क्षीणकल्मषाः ।**
**छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः ।।25।।**

**याप्रमाणे बाह्य सुखदुःखाची अपेक्षा न ठेविता जो अंतःसुखी म्हणजे अंतःकरणातच सुखी झाला, जो अंतरातच आराम पावू लागला,आणि तसेच ज्याला हा अंतःप्रकाश मिळाला तो कर्मयोगी ब्रह्मरूप होऊन त्यालाच ब्रह्मनिर्वाण म्हणजे ब्रह्मात मिळून जाण्याचा मोक्ष प्राप्त होतो. ज्या ऋषीची द्वंद्व-बुद्धि सुटली म्हणजे सर्व ठीकाणी एकच परमेश्वर आहे हे तत्त्व ज्यानी जाणिले,ज्यांची पापे नाहीशी झाली,आणि जे आत्मसंयमनाने सर्व भूतांचे हित करण्यात रत झाले त्यांना हा ब्रह्मनिर्वाणरूप मोक्ष मिळत असतो.**

म्हणौनि असो हे आघवे ; ।एथ , न बोलणे काय बोलावे ? ।
ते खुणाचि [1] पावले स्वभावे । आत्माराम [2] ।। 136।। 1 मर्म 2 ब्रह्मनिष्ट
जे ऐसेनि सुखे मातले , । आपणपाचि आपण गुंतले , ।
तें , मी जाणे निखिळ वोतले । सामरस्याचे ।।137।।
ते आनंदाचे अनुकार [3] , । सुखाचे अंकुर , । 3 प्रतिबिंब
कीं , महाबोधे विहार [4] । केले जैसे ।। 138।। 4 घर
ते विवेकाचे गांव , । की परब्रह्मीचे स्वभाव , ।
नातरी , अळंकारले अवयव । ब्रह्मविद्येचे ।।139।।
ते सत्त्वाचे सात्त्विक , । की चैतन्याचे आंगिक [5] । 5 स्वतःच
हे बहु असौ; एकैक । वानिसी काई ? ।।140।।
' तू संतस्तवनी रतसी । तरी कथेचि से [6] न करिसी । 6 आठवण
की निराळी बोल देखसी । सनागर [7] ।।141।। 7 अतीशय चांगले
परि तो रसातिशयो मुकुळी [8] । मग ग्रंथार्थदीपु उजळी । 8 आवरून घेणे
करी साधुहृदया राउळी । मंगळउखा [9] ' ।।142।। 9 मंगल पहाट
ऐसा श्रीगुरुचा उवायिला [10] । निवृत्तिदासासी पातला । 10 केलेला ईशारा
मग तो म्हणे ' श्रीकृष्ण बोलिला ।तेचि आइका ' ।।143।।
अर्जुना , अनंत सुखाच्या डोही ।एकसरा [11] तळुचि घेतला जिही । 11 एकदम
मग स्थिराऊनि , तेही ।तेचि जाहले ।।144।।
अथवा , आत्मप्रकाशे चोखे , । जो आपणपेचि विश्व देखे , ।
तो देहेचि परब्रह्म , सुखे । मानु येईल ।।145।।
जे साचोकारे परम , । ना ते अक्षर निःसीम , ।
जिये गावीचे निष्काम । अधिकारिये ।।146।।
जे महर्षी वाढले , । विरक्ता भागा फिटले [12] । 12 वाट्याला आले
जे निःसंशया पिकले । निरंतर ।।147।।

**कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम् ।**
**अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम् ।।26।।**

**कामक्रोधविरहित,आत्मसंयमी व आत्मज्ञानसंपन्न असे जे यति त्यांना अभितः म्हणजे सभोवार अगर समोर ठेवल्याप्रमाणे अर्थात बसल्या ठीकाणी ब्रह्मनिर्वाणरूप मोक्ष मिळतो.**

जिही विषयांपासोनि हिरतले [1] । चित्त , आपुले आपण जिंतिले , । — 1 हिराउन घेतले
ते निश्चित जेथ सुतले [2] , । चेतीचिना ।। 148।। — 2 झोपले
ते परब्रह्म निर्वाण , । जे आत्मविदांचे कारण , ।
तेचि ते पुरुष जाण । पंडुकुमरा ! ।।149।।
ते ऐसे कैसेनि जहाले , । जे देहीचि ब्रह्मत्वा आले , ।
हे पुससी , तरी भले ! । संक्षेपे सांगो ।।150।।

**स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवान्तरे भ्रुवो ः ।**
**प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यन्तरचारिणौ ।।27।।**
**यतेन्द्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायण ः ।**
**विगतेच्छाभयक्रोधो यः सदा मुक्त एव सः ।।28।।**

**बाह्य पदार्थाशी इंद्रियांचे सुखदुःखद संयोग बाहेरच्या बाहेर ठेवून,दृष्टि दोन भुवयांच्या मध्ये राखून आणि नाकातून वहाणारे प्राण आणि अपान सम करून इंद्रिये मन व बुद्धि यांचे ज्याने संयमन केले, आणि इच्छा,भय व क्रोध ही ज्याला सुटली,तो मोक्षपरायण मुनि सदासर्वदा मुक्तच म्हणावयाचा.**

तरी वैराग्याचेनि आधारे । जिही विषय दवडूनि बाहिरे , ।
शरीरी एकंदरे । केले मन ।।151 ।।
सहजे, तिही, संधी भेटी [3], । जेथ भ्रूपल्लवा [4] पडे गाठी , । — 3 मिळतात 4 भुवयांच्या
तेथ , पाठीमोरी दिठी । पारखोनिया [5] ।। 152 ।। — टोके 5 बंद करून
सांडूनि दक्षिण वाम , । प्राणापानसम ।
चित्तेसी व्योम- । गामिये करिती [6] ।।153।। — 6 आकाशाकडे जाणारे
तेथ , जैसी रथ्योदके [7] सकळे । घेऊनि , गंगा समुद्री मिळे । — 7 रस्त्यावरून वाहणारे
मग ,एकेकु वेगळे । निवडु नये ।।154।। — पाणी
तेसी , वासनांतराची विवंचना [8] ,। मग आपैसी पारुखे [9] ,अर्जुना ! । — 8 निवड 9 बंद पडते
जे वेळी , गगनी [10] , लयो , मना , ।पवने कीजे ।।155।। — 10 मनरुपी चिदाकाशात
जेथ हे संसारचित्र उमटे , । तो मनोरुप पटु फाटे , ।
जैसे , सरोवर आटे , ।मग प्रतिमा नाही ।।156।।
तैसे , मन एथ मुद्दल जाय , ।मग अहंभावादिक के आहें ? ।
म्हणौनि , शरीरेचि ब्रह्म होये । अनुभवी तो ।।157।।

**भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् ।**
**सुहृदं सर्व भूतानाम् ज्ञात्वा मां शान्तिमृच्छति।।29।।**

**सर्व यज्ञ व तप यांचा भोक्ता, स्वर्गादि सर्व लोकांचा मोठा धनी, आणि अवघ्या भूतांचा सखा, असा जो मी , त्या मला याप्रमाणे ओळखिले म्हणजे शांति पावतो.**

आम्ही मागां , हन , सांगितले । जे देहीचि ब्रह्मत्व पावले ,।
ते येणे मार्गे आलें । म्हणौनियां ।।158।।
आणि यमनियमांचे डोंगर , । अभ्यासाचे सागर , ।
क्रमोनि हे ,पार ।पातले तें ।।159।।
तिही आपणपे करूनि निर्लेप , । प्रपंचाचे घेतले माप [1] । 1 झाडा घेतला
मग साचाचेचि [2] रूप ।होऊनि ठेले ।।160।। 2 ब्रह्म
ऐसा योगयुक्तीचा उद्देशु , । जेथ बोलिला हृषीकेशु ।
जेथ अर्जुनु , सुदंशु[3] । म्हणौनि , चमत्कारला ।।161।। 3 मर्मज्ञ
ते देखिलिया , कृष्णे जाणितले , । मग हांसोनि पार्थाते म्हणितले ।
' काई पां चित्त उवाइले [4] । इये बोली तुझे ? ' ।।162।। 4 प्रसन्न झाले
तंव अर्जुन म्हणे , ' देवो । परचित्तलक्षणाचा [5] रावो । 5 मनकवड्या
भला जाणितला , जी भावो । मानसु माझा ।।163।।
म्यां जे काही विवरोनि [6] पुसावे , । ते आधीचि जाणितले देवे , । 6 विचार करून
तरी , बोलिले तेचि सांगावे । विवळ [7] करूनि ।।164।। 7 स्पष्ट
एऱ्हवी तरी , अवधारा [8] ।जो दाविला तुम्ही अनुसारा [9] । 8 ऐका 9 मार्ग
तो पव्हण्याहूनि पायउतारा , । सोहपा जैसा ।।165।।
तैसा , सांख्याहूनि प्रांजळा [10] । आम्हांसारिखियां अभोळा [11] । 10 सरळ 11 दुर्बल
एथ आहाति [12] ,परि काही काळा [13]। तो साहो [14] ये वर [15] ।।166।। 12 आहेत 13 काळ
म्हणोनि , एक वेळ , देवा ।तोचि पडताळा [16] घेयावा । 14 सहन करणे
विस्तरेल तरी सांगावा । साद्यंतुचि ' ।।167।। 15 या पेक्षा 16 अनुवाद
तंव श्रीकृष्ण म्हणती , ' हो कां ! ।तुज हा मार्गु गमला निका ? ।
तरी , काय, जाहले , आइकीजो कां । सुखे बोलो ।।168।।
अर्जुना ! तूं परिससी , । परिसोनि अनुष्ठिसी , ।
तरी , आम्हासीचि वानी कायसी । सांगावयाची ? ' ।।169।।
आधीचि चित्त मायेचे , ।वरी मिष [17] जाहले पढियंतयाचे [18] । 17 निमित्त 18 आवडता
आता ते अद्भुतपण स्नेहाचे । कवण जाणे ! ।।170।।
ते म्हणो , कारुण्यरसाची वृष्टि , । की नवया स्नेहाची सृष्टि , ।
हे असो ; नेणिजें , दृष्टि ।हरीची वानूं ।। 171।।
जे अमृताची वोतली [19] , । कीं , प्रेमचि पिउनि मातली , । 19 घडणे
म्हणौनि , अर्जुनमोहे गुंतली , । निघो नेणे ।।172।।

हे बहु जे , जे , जल्पिजेल [1] , । तेथे कथेसि फाकु होईल , । — 1 बडबड करेल
परि , ते स्नेहरूपा [2] , न येल ।बोलवरी [3] ।।173।। — 2 प्रेमाचे रुप 3बोलून
म्हणौनि , विसुरा [4] काय येणे । तो ईश्वरु कवळावा कवणे ?। — दाखवता येणार नाही 4 विस्तार
जो आपुले मान नेणे , । आपणचि ।।+174।।
तरी मागील ध्वनीआंतु [5] ।मज गमला सावियाची [6] मोहितु । — 5 संभाषणावरुन
जे , बलात्कारे असे म्हणतु , । ‘ परिस बापा ‘ ।।175।। — 6सहजच
अर्जुना ! जेणे , जेणे , भेदे । तुझे का चित्त बोधे , ।
तैसे , तैसे , विनोदे [7] । निरुपिजेल ।।176।। — 7 आनंदाने
तो काइसया [8] नाम योगु ? । तयाचा कवण उपेगु ? । — 8 कशाला
अथवा , अधिकारप्रसंगु ।कवणा येथ ? ।।177।।
ऐसे जे , जे , काही । उक्त [9] असे इये ठाई ,। — 9 सांगावयाचे
ते आघवेचि , पाही ।सांगेन आतां ।।178।।
तू चित्त देऊनि अवधारी ‘ ।ऐसे म्हणौनि , श्रीहरी ।
बोलिजेल , ते पुढारी । कथा आहे ।।179।।
श्रीकृष्ण अर्जुनासी संगु । न सांडोनि , सांगेल योगु ।
तो व्यक्त करुं प्रसंगु । म्हणे निवृत्तिदासु ।।180।।

**इति श्रीमद्भगवद्गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मसन्यासयोगो नाम पंचमोऽ ध्यायः ।।5।।**

## कठीण ओव्यांचा अर्थ

47. जेव्हा तो भ्रांतिरुप अंथरुणावर निजला होता, तेंव्हा स्वप्नसुखाने भुलला होता. परंतु आता ब्रह्मात्मैक्य ज्ञानाचा उदय झाल्यावर तो जागा झाला म्हणून तो कर्ता राहत नाही.

87. पंचकोश विचाराने त्याहून आत्मा भिन्न आहे असा बुद्धीचा निश्चय झाल्याने आत्म्याचे अपरोक्ष स्वरुपज्ञान व्यक्त होते. तो आपला आत्मा स्वरुपतः ब्रह्मस्वरुप आहे असे ऐक्य भावनेने चिंतन करतो व पूर्णब्रह्माकार वृत्ती स्थिर ठेवून राहतो. रात्रंदिवस ब्रह्मात्मैक्य ज्ञानानुसंधान तत्पर होऊनच राहतो.

174. परंतु यात आश्चर्य ते कसले? ज्या परमेश्वराला स्वतःचे रूप वर्णन करिता येत नाही त्याचे वर्णन दुसरा कसा काय करणार?